महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५ वा | दिनांक : ११/१०/२०२४ | वार : शुक्रवार

## अखेरचा सलाम! उदार अंत:करणाच्या उद्योजकाला निरोप देताना महाराष्ट्रासह देशही हळहळला





**मुंबई :** यशस्वी उद्योजकाचं उत्तम उदाहरण, परोपकार वृत्ती असणारे दयाळू व्यक्तीमत्त्व, प्राणीमात्रांवर पराकोटीचं प्रेम आणि माणसातलं माणूसपण जपणाऱ्या रतन टाटा अनंतात विलीन झाले. वरळीतील स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रतन टाटा यांना अखेरचा निरोप देण्याकरता देशभरातील असंख्य लोक मुंबईत दाखल झाले होते. पारशी समाजाच्या विधीनुसार त्यांचावर अंत्यसंस्कार करण्यात आले. विद्युत स्मशानभूमीत त्यांनी अखेरचा निरोप दिला.

टाटा यांचे पार्थिव दक्षिण मुंबईतील नरिमन पॉइंट येथील नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (NCPA) येथे गुरुवारी सकाळी साडेदहा ते दुपारी चार या वेळेत अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी वरळीतील स्मशानभूमीत नेण्यात आले. केंद्राच्या वतीने रतन टाटा यांच्या अंत्यसंस्काराला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित होते. अमित शहा, केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि इतर मंत्री आणि अंबानींसारखे उच्च उद्योजकही उपस्थित होते.

टाटा या नाममुद्रेच्या माध्यमातून भारतीय उद्योग जगताला आधुनिक युगात नेण्यासाठी झटणारे आणि या क्षेत्राचा ठसा आंतरराष्ट्रीय प्रतलावर उमटवणारे द्रष्टे उद्योगपती, दानवीर, टाटा उद्योसमुहाचे माजी अध्यक्ष रतन नवल टाटा यांचं बुधवारी रात्री मुंबईतील रुग्णालयात वृद्धापकाळाने निधन झाले. रतन टाटा गेले काही दिवस आजारी होते. आपल्या प्रकृतीस धोका नसल्याचं त्यांनी सोमवारीच समाजमाध्यमांवर जाहीर केले होते. परंतु, बुधवारी त्यांची प्रकृती खालावली आणि रात्री उशिरा त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचं वृत्त समजातच समाजमाध्यमांवर अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांनी त्यांच्याप्रती शोक व्यक्त केला.

सामान्य नागरिकांसह अनेक दिग्गज लोकांनी रतन टाटांना अखेरचा निरोप देण्याकरता गर्दी केली होती. तसंच, त्यांच्या सावत्र आई सिमोन टाटा याही अंत्यसंस्कारावेळी उपस्थित होत्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आसियान-भारत आणि पूर्व आशिया शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी लाओसला गेले असल्याने ते यावेळी उपस्थित राहू शकले नाहीत.

## रतन टाटा यांना 'भारतरत्न' द्या:राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव पारित

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने गुरुवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांना त्यांचे कार्यकर्तृत्व लक्षात घेऊन 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार देण्याचा प्रस्ताव पारित केला आहे. हा प्रस्ताव आता पुढील कारवाईसाठी केंद्राकडे पाठवला जाणार आहे.

सुप्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचे बुधवारी रात्री उशिरा दु:खद निधन झाले. ते 86 वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे अवघा देश शोकसागरात बुडाला आहे. त्यांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र सरकारने गुरुवारी 1 दिवसाचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीतही रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी एक शोकप्रस्ताव सादर केला. यावेळी पद्मविभूषण रतन टाटा यांना भारतरत्न देण्याची भारत सरकारला विनंती करणारा एक प्रस्तावही संमत करण्यात आला.

मंत्रिमंडळाने पारित केलेल्या शोकप्रस्तावात नमूद करण्यात आले आहे की, उद्यमशीलता हा देखील समाज उभारणीचा प्रभावी मार्ग असतो. नवनवीन उद्योगांच्या उभारणीनेच देश प्रगतीपथावर नेता येतो, मात्र त्यासाठी हृदयात निस्सीम देशप्रेम आणि आपल्या समाजाप्रती तितकाच प्रामाणिक कळवळा हवा. रतन टाटा यांच्या रुपाने आपण अशाच विचारांचा एक समाजसेवी, द्रष्टा आणि देशप्रेमी मार्गदर्शक गमावला. भारताच्या उद्योगक्षेत्रातच नव्हे, तर समाज उभारणीच्या कामातही टाटा यांचे योगदान अपूर्व होते. ते महाराष्ट्राचे सुपुत्र होते. भारताचा अभिमान होते. स्वयंशिस्त, स्वच्छ कारभार आणि मोठमोठे उद्योग सांभाळताना पाळलेली उच्च प्रतीची नैतिक मूल्ये या कठोर कसोट्या पार पाडत टाटा यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला आणि भारताचाही ठसा उमटवला. त्यांच्या रुपाने देशाचा एक प्रमुख आधारस्तंभ कोसळला आहे.

रतन टाटा हे टाटा समुहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पणतू होते. त्यांनी टाटा समुहाचे अध्यक्ष म्हणून आणि नंतर अंतरिम अध्यक्ष म्हणून या समुहाचा कारभार अनेक वर्ष पाहिला. देशातील सर्वात जुन्या अशा टाटा समुहाच्या चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख म्हणून अतिशय परोपकारी वृत्तीने त्यांनी काम केले.

रतन टाटा यांनी नैतिक मूल्यांची जी जपणूक केली, ती इतर उद्योजकांसाठी आणि उद्योगविश्वातील भावी पिढ्यांसाठीही दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतील. ते तत्त्वनिष्ठ कर्मयोगी होते. स्वातंत्र्यानंतर देशाची पुन्हा उभारणीत टाटा समूहाचा वाटा सिंहाचा होता. या समूहाच्या माध्यमातून रतन टाटा यांनी भारताचा झेंडा जागतिक पातळीवर दिमाखाने फडकता ठेवला. मोटारीपासून मिठापर्यंत आणि कंप्युटरपासून कॉफी-चहापर्यंत असंख्य उत्पादनांशी टाटा हे नाव अभिमानाने जोडले जाते.

शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवेच्या क्षेत्रातही रतन टाटा यांनी आपले अनन्यसाधारण योगदान दिले. मुंबईवर झालेल्या 26/11 च्या हल्ल्यानंतर त्यांनी दाखवलेला खंबीरपणा स्मरणात राहणार आहे. कोविड काळात रतन टाटा यांनी पीएम रिलीफ फंडाला तत्काळ 1500 कोटी रुपये दिले. तसेच कोविड काळात रुग्णांसाठी त्यांची बहुतांश हॉटेलही उपलब्ध करून दिली. हा त्यांचा मोठेपणा कायम लक्षात राहणारा आहे.

नवनिर्मिती आणि दानशूरता यांचा अपूर्व संगम त्यांच्या ठायी होता.

त्यांनी कधीही आपल्या 'टाटा मूल्यां' शी तडजोड केली नाही. तरुणांमधील कर्तृत्वाला, प्रयोगशिलतेला प्रोत्साहन देण्यात ते कायम आघाडीवर होते. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात तरुणांच्या कौशल्याला वाव आणि रोजगाराची संधी देण्यासाठी त्यांनी इनोव्हेशन सेंटर सुरू केलं. महाराष्ट्र सरकारचा पहिला 'उद्योग रत्न' हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचं भाग्य आपल्याला लाभलं. त्यांच्या मार्गदर्शनाचा महाराष्ट्राला सदैव झाला. रतन टाटा यांच्या निधनाने आपला देश आणि महाराष्ट्राचेही कधीही भरुन न येणारे नुकसान झाले आहे. टाटा समूहाच्या विशाल परिवाराच्या दु:खात मंत्रिमंडळ सहभागी आहे. त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभो, ही प्रार्थना. देशाच्या या महान सुपुत्राला महाराष्ट्रातील तमाम नागरिकांच्या वतीने राज्य मंत्रिमंडळाची भावपूर्ण श्रद्धांजली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४


## जयभवानीच्या विद्यार्थीनी केली बस स्थानकाची साफसफाई

### आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचा उपक्रम




**पाटोदा :** येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या वतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री शिक्षणमहर्षी मा. श्री. शिवाजीराव दादा पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा शहरातील बस स्थानकाची साफसफाई करण्याचा उपक्रम हाती घेतला. महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरातील बस स्थानकात जाऊन तेथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.विद्यार्थीनीने हातात झाडू घेऊन बस स्थानकाच्या परिसर स्वच्छ केला.तेथिल कचरा गोळा करून कचरा पेटीत टाकला.

या प्रसंगी आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाच्या समन्वयक श्रीमती प्रा.डॉ .कल्पना घारगे व प्रा.डॉ.बंडू लोखंडे यांची उपस्थिती होती.महाविद्यालयाच्या या बस स्थानक साफसफाई उपक्रमाचे बस स्थानकातील प्रवाशांनी कौतुक केले.

## शरीर,मन,बुद्धी,आत्मा यांचा विकास म्हणजे व्यक्तीमत्व विकास - ॲड. राहुल नावंदर



**छत्रपती संभाजीनगर :** दिनांक - १०-१०-२०२४ भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद संचलित राजीव गांधी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, करमाड, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथील आय. क्यू. ए. सी. विभाग, एन. एस. एस. आणि करिअर कट्टा विभाग संयुक्त विद्यमाने युवा संवाद आयोजित **"स्पर्धा परीक्षा आणि व्यक्तीमत्व विकास"** या विषयावर एकदिवशीय कार्यशाळा आज दिनांक १०-१०-२०२४ गुरुवार रोजी आयोजित केले होते. वेळ- सकाळी ११.००. या कार्यशाळेसाठी प्रमुख व्याख्याते / मार्गदर्शक – ॲड. राहुल नावंदर, (प्रसिद्ध वक्ते आणि लेखक) यांनी " स्पर्धा परीक्षा आणि व्यक्तीमत्व विकास"

या विषयावर विद्यार्थ्यांना युवा संवाद साधला विषयाची मांडणी करताना नावदर आजच्या काळात व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठी प्रत्येकाने सकारात्मक पद्धतीने शरीर,मन आणि बुद्धी याद्वारे वाचन,मनन,चिंतन यातुन आत्मविश्वास जिंकण्यासाठी करिअरकडे जाण्यासाठी प्रत्येकाने आपआपले ज्ञान आणि कौशल्य आत्मसात केले पाहीजे असे सुचविले, तसेच स्पर्धा परीक्षा विषयी यशाचा मुलमंत्र देखील सविस्तरपणे मार्गदर्शनातुन दिला.

या कार्यशाळेचे उद्घाटक कार्यक्रमाचे अध्यक्ष – प्राचार्य डॉ.नरेश डहाळे यांनी केले, प्रमुख उपस्थिती मध्ये डॉ. बाळासाहेब लिहिणार डॉ. लक्ष्मीकांत दांडगे डॉ. जयश्री पाटील होते. कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. कालिदास फड यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. किशोर काळे आणि आभार प्रा.लक्ष्मण खरात यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थी ऊपस्थित होते. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील मोठ्या संख्येने विद्यार्थी ऊपस्थित होते.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला कला महाविद्यालयात दोन दिवसीय आजीवन शिक्षण व विस्तार विभाग अंतर्गत विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर अनुदान प्राप्तविद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळा दिनांक ८ आणि ९ ऑक्टोबर २०२४ रोजी संपन्न झाली.दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर उपजिल्हाधिकारी तथा सहसंचालक मा.अंजली धानोरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तर यशस्वी उद्योजिकेची मुलाखत या विषयांतर्गत ग्रामीण भागातील महिलांना महिला बचत गटाच्या माध्यमातून व्यावसायाभिमुख बनवून त्यांना रोजगाराची संधी व प्रशिक्षण देणाऱ्या उद्योजिका सौ.संध्या उपेंद्र कुलकर्णी यांचा व्यावसायिक जीवन प्रवास मुलाखती च्या माध्यमातून जाणून घेण्यात आला."स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन"या विषयावर मार्गदर्शन करताना मा.अंजली धानोरकर यांनी स्वतः च्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यामध्ये स्वतः ला सक्षम करत आत्मविश्वास आणि मेहनत घेण्याची तयारी यांचे महत्त्व विविध उदाहरणातून पटवून सांगितले.

उद्योजिका सौ.संध्या उपेंद्र कुलकर्णी यांनी ग्रामीण भागातील महिलांना एकत्रित करून त्यांना रोजगाराभिमुख बनविण्यासाठी कर्ज पुरवठा व विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांना स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी कसे प्रोत्साहन दिले याविषयी माहिती देऊन त्यातून विद्यार्थिनींना प्रेरीत करून भरडधान्या पासून तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांचे प्रशिक्षण व विक्री या संदर्भात सविस्तर माहिती दिलीकार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी विद्यार्थिनींचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती देऊन या उपक्रमांचा फायदा विद्यार्थिनींनी करून घेतला पाहिजे असे आवाहन त्यांनी यावेळी केले, कार्यशाळेचे आभार प्रकटन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. मीनाक्षी देव -निमकर यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भार्गवी मोदी हिने केले तर मा अंजली धानोरकर यांचा परिचय कु.साक्षी ढवळणपुरे तर उद्योजिका सौ संध्या कुलकर्णी यांचा परिचय कु.राधिका दैठणकर हिने करून दिला, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती राष्ट्रगीताने कार्यशाळेचा समारोप झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४

## सायगव्हाण येथील नवरात्र उत्सवाच्या निमित्त मनोज भाऊ पवार यांच्यावतीने देणगी



**कन्नड : (अक्षय चव्हाण)** तालुक्यातील सायगव्हाण (नागद) येथील नवदुर्गा मित्र मंडळाला कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातील लोकप्रिय उद्योजक तथा समाजसेवक श्री. मनोज पुष्पाबाई केशवराव पवार यांच्या वतीने मंडळासाठी आर्थिक देणगी देण्यात आली. यावेळी आर्थिक देणगी नवदुर्गा मित्र मंडळाच्या हातात देण्यात आली समाजसेवक तथा शिवाजी आबा बोलधने प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री.आकाश भाऊ बोलधने, सामाजिक कार्यकर्ते श्री. अशोक भाऊ वाहूळ, नागद सर्कल प्रमुख भगवान ठाकरे सर, सागर पाटील यावेळी गावातील युवकांची व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी मित्र मंडळाने उद्योजक मनोज भाऊ पवार यांचे आभार मानले.



## वादळ

आज मला पहिल्यांदाच असाह्य झालं
तिच्याशी झालेलं वादळ
मनात काहूर माजून गेलं

वाटलं मनाला जावून तिला शोधावं
मनातील सार काही सांगून तरी यावं

तू जनातली नाहीस मनातली आहे.
शब्दातली नाहीस स्पंदनातली आहेस

फुटलाच कधी पाझर तर हो तरी म्हणेल.
नाहीतर रागाने जा तरी म्हणेल.

चल बीचल विचारातच मी तयार झालो.
अन् तसल्या तंद्रीतच
रस्त्यावर चालत ही आलो

अचानकच भुरळ
मी रस्त्यावरच पडलो
सुध आली तेव्हा
कशाची ओढ म्हणून स्वतः वरच चिडलो.

आजू बाजूला पाहतो तर माझ्याभोवती
तोबा गर्दी
त्यामध्ये ती मात्र माझ्यासाठी
झाली होती अर्धी.
त्यामध्ये ती मात्र माझ्यासाठी झाली होती अर्धी.

**- डॉ. बाळासाहेब लिहिणार**

**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

## तारा पान सेंटरचे मालक हाजी शरफोद्दीन यांचे निधन:मनमिळावू स्वभावामुळे प्रसिद्ध; 'तारा' वरील पान ठरले 'स्टेटस सिम्बॉल'



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील उस्मानपूरा येथील प्रसिद्ध तारा पान सेंटरचे मालक हाजी शरफोद्दीन सिद्दीकी यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. संभाजीनगरच नव्हे तर राज्यभरातील पान प्रेमींना हाजी शरफोद्दीन हे परिचित होते. त्यांचा मनमिळावू स्वभावामुळे तारा पान सेंटरचे पान प्रसिद्ध झाले, असे म्हटले ती वावगे ठरणार नाही. उस्मानपूरा परिसरातील बडी मस्जिद येथे नमाज-ए-जनाजा अदा केली जाईल. तर दफनविधी उस्मानपूरा कब्रस्तानात होणार आहे. त्यांच्या पश्चात पाच मुली, एक मुलगा, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

आपल्या देशामध्ये विड्याच्या पानाचे एक वेगळेच महत्त्व आहे. पूजेपासून ते कोणत्याही खास कार्यक्रमामध्येही पानाचा उपयोग केला जातो. काही गावांमध्ये आजही लग्नातील वऱ्हाडी लोकांना पान देऊन स्वागत केले जाते. पान आपल्या देशातील सर्वात प्राचीन आणि जास्त पसंत केली जाणारी एक गोष्ट आहे. आयुर्वेदानुसार पान यौन शक्ती वाढवण्यासही मदत करते. परंतु काही लोक माऊथ फ्रेशनरसाठी पानाचा वापर करतात. याचा पानाला छत्रपती संभाजीनगरच्या तारा पान सेंटरने वेगळी ओळख मिळवून दिली आहे. 'तारा' वरील पान खाने हे स्टेटस सिम्बॉल झाले आहे. याचे सर्वाधिक श्रेय हे हाजी शरफोद्दीन यांना जाते.

### कोहिनुर पानाची चर्चा

येथे कोहिनुर पानाची चर्चा ही केवळ शहरातच नाही तर राज्यात होत असते. हे पान विशेषतः कपलसाठी बनवले जाते. असे सांगितले जाते की, हे पान खाल्ल्याने कपलमधील प्रेम वाढते. यासोबतच या पानाचा प्रभाव दोन दिवस राहतो असाही दावा केला जातो. सामान्यताही पानाची किंमत १०, २० किंवा मग १०० रुपयांपर्यंत असते परंतु या पानाची किंमत ५००० रुपये आहे. यामुळेच या पानाचे नाव 'कोहिनुर' ठेवण्यात आले आहे. हे पान पुरुष आणि महिला दोघांसाठीही वेगवेगळ्या पद्धतीने बनवले जाते. हे खास पान कस्तुरी आणि केशरने बनते. यामध्ये एकप्रकाचे लिक्विड टाकले जाते, जे पश्चिम बंगालवरून मागवले जाते. लोक या पानाला 'देशी व्हायग्रा' नावानेही ओळखतात.

### आईकडून मिळाला वारसा

मोहम्मद शरफुद्दीन सिद्दीकी गेल्या तीन दशकांपासून हे पान विकत होते. हे पान ते फक्त विवाहित जोडप्यांना देत होते. या विषयी सिद्दीकी सांगायचे की, 'माझ्या आईने मला हे पान दिले आणि ते खायला सांगितले. तसेच आवडले तर विकायला सांगितले. त्या दिवसापासून, मी माझ्या दुकानाच्या मेनूमध्ये हे पान समाविष्ट केले. या पानाची रेसिपी फक्त त्यांच्याकडेच होती, अशी देखील चर्चा आहे.

## सुविचार

**आयुष्य हे एक सुंदर प्रवास आहे; प्रत्येक दिवसाला एक नवीन अध्याय मानून जगा.**

## उद्धव ठाकरेंचे सरकार पाडण्यात माझा हात: ६ महिने मिशन चालवले, गुणरत्न सदावर्तेंचा आणखी एक गौप्यस्फोट





**मुंबई :** उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडण्यासाठी मी ६ महिने मिशन चालवले होते, असा गौप्यस्फोट वकील गुणरत्न सदावर्ते यांनी केला आहे. गुणरत्न सदावर्ते सध्या बॉलिवूड अभिनेता होस्ट करत असलेल्या बिग बॉस च्या १८ व्या सीझनमध्ये सहभागी झाले आहेत. त्यांनी घरातील सदस्यांशी बोलताना उद्धव ठाकरेंचे सरकार पाडण्याबाबत मोठा खुलासा केला.

हिंदी बिग बॉसच्या १८ सीझनला सुरुवात झाली असून यंदाच्या सीझनमध्ये फिल्मइंडस्ट्रीसह विविध क्षेत्रांतील लोकप्रिय लोक घरात कैद झाली आहेत. यामध्ये महाराष्ट्रात विविध वक्तव्ये आणि मुद्द्यांसाठी चर्चेत आलेले ॲड. गुणरत्न सदावर्ते यांचाही सहभाग आहे. गुणरत्न सदावर्ते यांनी पहिल्या तीन चार दिवसांमध्येच आपल्या वक्तव्यांनी खळबळ उडवून दिली आहे. महाविकास आघाडीचे सरकार कसे पडले, मविआच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप, एकनाथ शिंदेंनी केलेली बंडखोरी या बऱ्याच गोष्टींवर ॲड. गुणवर्ते सदावर्ते यांनी गौप्यस्फोट केला आहे.

काय म्हणाले गुणरत्न सदावर्ते? महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी सरकार स्थापन केले होते. असे होते की, उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडण्यासाठी मी सहा महिने जे मिशन चालवले होते, ट्रान्सपोर्टर्स लोकांचा (एसटी कर्मचाऱ्यांचा) संप. त्या संपाची दखल न्यूयॉर्कमध्येही घेतली होती. असे ते आंदोलन सुरू होते. त्यामुळेच उद्धव आणि शरद पवार यांचा आत्मविश्वास ढासाळला होता. त्यानंतर एकनाथ शिंदे सोडून गेले. काही आमदार माझ्याकडूनही फुटले होते, असे सदावर्ते बिग बॉसच्या घरातील सदस्यांशी म्हणतात.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ११ ऑक्टोबर २०२४


# जल्लोष लोककलेचा स्पर्धा महोत्सवात बालकांच्या सादरीकरणाने प्रेक्षक झाले मंत्रमुग्ध













**छत्रपती संभाजीनगर :** बालरंगभूमी परिषद मुंबईच्या वतीने अभिनेत्री नीलमताई शिर्के अध्यक्ष बालरंगभूमी परिषद यांच्या कल्पक नेतृत्वाने महाराष्ट्रात जल्लोष लोककलेचा कार्यक्रमांतर्गत लोककला स्पर्धा महोत्सव छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी तापडिया नाट्यगृहात जल्लोष लोककलेचा हा बालकांसाठीचा गायन ,वादन व नृत्याचा लोककला स्पर्धा महोत्सव संपन्न झाला.या महोत्सवात ४५० बाल कलाकारांनी महाराष्ट्रातील विविध लोककला लोकनृत्य सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.महोत्सवाचे उद्घाटन बालकांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी भाग्यरवी कुलकर्णी, नाटयशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ.जयंत शेवतेकर व प्रा.असलम शेख यांची उपस्थिती होती.

महोत्सवासाठी बालरंगभूमी परिषदे मुंबईचे प्रमुख कार्यवाह तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष मा .सतीश लोटके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विविध शाळा व संस्थेच्या बालकलावंतांनी भरभरून प्रतिसाद दिला या महोत्सवात छत्रपती संभाजीनगर, जालना , बुलढाणा या जिल्ह्यातील शाळा संस्थांनी सहभाग घेतला होता विशेष करून या लोककला महोत्सवात ७० टक्के विद्यार्थी हे ग्रामीण भागातून बालकलावंत सहभागी झाले होते हे विशेष.या महोत्सवानिमित्त झालेल्या विविध स्पर्धांमध्ये समुह लोकगीत गायनात सर्वोत्कृष्ट संघ औरा इंटरनेशनल स्कूल सुंदरवाडी छत्रपती संभाजीनगर , उत्कृष्ट संघ आदर्श कॉन्व्हेंट ज्ञानपीठ, चिखली जि. बुलढाणा, उत्तम संघ श्री सरस्वती भुवन विद्यालय वडोडा बाजार प्रशंसनीय संघ स्वराज संगीत महाविद्यालय सिडको व यूरेका इंफोसिस स्कूल बजाज नगर. समुह नृत्यात सर्वोत्कृष्ट संघ म.न. पा. शाळा मुकुंदवाडी, उत्कृष्ट संघ जि. प.शाळा सफियाबद, उत्तम संघ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मंठा , प्रशंसनीय संघ तुळजा भवानी प्राथमिक शाळा व युरेका इन्फोसिस स्कुल बजाजनगर. एकल लोकगीत गायनात सर्वोत्कृष्ट सिद्धिराम सरसे उत्कृष्ट पियूष ठाकुर , उत्तम प्रेम तेलंग, व प्रशंसनीय शुभ्रा मुळे व समर्थ शिंदे. एकल वादनात सर्वोत्कृष्ट कृष्णा केंद्र, उत्कृष्ट युवराज चाबुकस्वार, उत्तम शौर्य सम्राटवीर, प्रशंसनीय प्रेम कुकलारे व जय पठाडे वैयक्तिक नृत्यात सर्वोत्कृष्ट भाग्यश्री हिवाळे, उत्कृष्ट अक्षरा दोडे, उत्तम अंतरा सोनवणे, प्रशंसनीय मनस्वी गेडाम व आरुषी वाकळे. सर्व सन्मान पुरस्कार प्राप्त बालकांचा संघांचा सन्मान बालरंगभूमी परिषदेचे गोकुळ गायकवाड, वाल्मीक जाधव, अभिजीत भातलोढे ,लक्ष्मण अहिरे, श्रीपाद पदे, संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेचमहोत्सवासाठी सहभागी झालेल्या सर्व संघांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान केले गेले. या महोत्सवानिमीत्त आयोजित स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. संजय सांगवीकरडॉ. दिलीप खंडेराय, राहुलजी काकडे , ॲड. सुशील बनकर व भक्ती पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप कांबळे व प्रा. विशाखा शिरवाडकर यांनी केले तर प्रस्ताविक बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीचे सहकार्यवाह आसेफ शेख ( अन्सारी) व उपस्थितांचे आभार मानले , कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शाखेचे विनोद आघाव, रूपाली आल्हाट, रविराज कांबळे, अजय पहुरकर आदींनी परिश्रम घेतले तर दिवसभर चाललेल्या या नेत्रदिपक या महोत्सवासाठी प्राथमिक फेरी म्हणून व्हिडिओ मागविण्यात आले होते. व्हिडिओद्वारे निवड करून संघांना व विद्यार्थ्यांना महोत्सवात सादरीकरण करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.




